तरुण भारत संवाद

मंगळवार, २




तिने जिद्द ठेवली होती आपणही लष्कर सेवेतून देश सेवा करायची. त्यासाठी खडतर परिश्रम करावे लागतात याची तिला जाणीव होती. त्यामुळेच ती एका वेगळ्या ध्येयाने झपाटलेली होती आणि तिने ते सत्यात उतरवले. इंडियन मिलिटरी ॲकॅडमीच्या इतिहासात पहिली महिला लेफ्टनंट होण्याचा मान जयसिंगपूर येथील सई जाधव हिने मिळवला आणि लष्करी सेवेच्या इतिहासात कोल्हापूरचे नाव आणखी एका सुवर्ण अक्षराने कोरले. सईने मिळवलेले हे यश तमाम कोल्हापूरकर वासियांना अभिमानाचे आहेच, याशिवाय नव्या पिढीला तिची जिद्द आणि त्यामागचे कष्ट एक नवी प्रेरणा देणारी आहे.

# कोल्हापूरची सई लष्करात अधिकारी

## इंडियन मिलिटरी ॲकॅडमीच्या इतिहासात पहिली महिला लेफ्टनंट

## लष्करी सेवेच्या इतिहासात कोल्हापूरचे नाव उज्वल



▸संजय खूळ, इचलकरंजी

कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुका जसा कृषीप्रधान तालुका म्हणून ओळखला जातो तसेच देशसेवेची परंपरा असलेला तालुका म्हणून शिरोळची ओळख आहे. शिरोळ तालुक्यातील सैनिक टाकळी हे गाव देशसेवेसाठी देशभर परिचित आहे. याच तालुक्यातील सई जाधव मूळची जयसिंगपूरची. येथील १५व्या गल्लीत तिचे निवासस्थान आहे. सईच्या कुटुंबात लष्करी सेवेचा मोठा वारसा आहे. तिचे पणजोबा सुभेदार शंकरराव जाधव बहाद्दर ओबीआय ऑर्डर, ब्रिटिश लष्करात होते. मामा अनिल घाटगे भारतीय हवाई दलात 'फायटर पायलट' होते. वडील मेजर संदीप जाधवही सध्या भारतीय लष्करात कार्यरत आहेत. त्यामुळे सईलाही लष्करी सेवेचे आणि देश सेवेचे अत्यंत आवड निर्माण झाली. आवड असून चालणार नाही तर त्यासाठी कठोर परिश्रम घ्यावे लागणार, ही तिची जिद्द आणि मानसिकता पहिल्यापासूनच होती.

सईचे प्राथमिक शिक्षण जयसिंगपूर येथे मराठी माध्यमाच्या शाळेमधूनच झाले. त्यानंतर वडिलांची बदली झाल्यामुळे तिला बारावीपर्यंतचे शिक्षण वेगवेगळ्या ठिकाणी घ्यावे लागले. कोईमतूरमधील एयर फोर्स स्कूलमधून ती दहावी उत्तीर्ण झाली. बेळगावच्या जैन पी. यू. कॉलेजमधून बारावी झाल्यानंतर कोल्हापुरातील विवेकानंद महाविद्यालयातून तिने पदार्थ विज्ञान विषयातून बीएस्सी पदवी मिळवली. 'सिंबॉयसिस'मधून दूरस्थ विद्यार्थिनी म्हणून एमबीएचे शिक्षण घेत असताना ती स्पर्धा परीक्षेची तयार करत होती. याच दरम्यान केवळ पुरुषांना प्रशिक्षण देणाऱ्या इंडियन मिलिटरी ॲकॅडमीने महिलांना प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला.

डेहराडून येथील इंडियन मिलिटरी ॲकॅडमींला ९३ वर्षांचा इतिहास आहे.

### नियोजनबद्ध अभ्यास

सईने बारावीनंतर भारतीय लष्करी सेवेत जाण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी तिने नियोजनबद्ध अभ्यास केला. आज मोबाईलचा वापर युवा पिढी वेगवेगळ्या कारणासाठी करते. परंतु सईने याचा उपयोग विविध माहिती शोधण्यासाठी तसेच अभ्यासासाठी केला. सुरुवातीच्या काळात कोणतीही कोचिंग क्लास न लावता त्यांनी अनेक व्हिडिओ पाहून तसेच पुस्तकांचा वापर करून स्वत:चे नोट्स तयार केले. सर्व्हिस सिलेक्शन बोर्डमध्ये निवड झाल्यानंतर मुलाखतीसाठी कठोर परीक्षा द्यावी लागते, याची जाणीव ठेवून तिने कोचिंग क्लास पूर्ण केले. तब्बल पाच दिवस चालणारी ही मुलाखत सईने अत्यंत आत्मविश्वासाने दिली आणि या आत्मविश्वासातूनच त्यांनी आपल्या ध्येयाला यश मिळवून दिले.





## लष्करात अनेक संधी

**कोणत्याही शाखेचा अभ्यास केल्या तरीही लष्करात अनेक संधी आहेत या संधीचा अभ्यास करून युवक युवतीनी ध्येय गाठावे, असे आवाहन सईने केले. भरतीतून जवान होणे यापलीकडेही अनेक अधिकाऱ्यांच्या जागा आपल्याला काबीज करता येतात. कोणतीही पदवी परीक्षा झाल्यानंतर एनडीए मध्ये जाता येते. त्याचबरोबर कम्बाईन डिफेन्स सर्व्हिस या परीक्षेच्या माध्यमातून शॉर्ट सर्विसमध्ये सैन्य दलात भरती होता येते. एनसीसीचे सी सर्टिफिकेट असलेल्या कॅंडिडेटना कोणतीही लेखी परीक्षा न देता सर्विस सिलेक्शन बोर्डच्या माध्यमातून डायरेक्ट मुलाखतीद्वारे अनेक संधी असतात. कोणतीही अभियांत्रिकी पदवी घेतलेल्याना टेक्निकल ग्रॅज्युएशन कमिशन या माध्यमातूनही अधिकारी तसेच वेगवेगळ्या पदावर नियुक्त होता येते. जेएजी (जज अडवोकेट जनरल) या परीक्षेच्या माध्यमातून लीगल सेल असलेल्या विभागातही भरती होता येते. पोस्ट ग्रॅज्युएट असलेल्या उमेदवारांना आर्मी एज्युकेशन कोअर या ठिकाणी प्रशिक्षणार्थी म्हणून नियुक्त होता येते. सैन्य दलातील एकत्रित माहिती *joinindianarmy.gov. in* या वेबसाईटवर मिळू शकते, याचबरोबर हवाई दलात पायलट व्यतिरिक्त अनेक ग्राउंड ऑफिसर साठी वेगवेगळ्या संधी असतात *AFCAT* परीक्षेच्या माध्यमातून आपण अधिकारी होऊ शकतो, असेही तिने यावेळी सांगितले.**

डेहराडून हे भारतीय लष्करासाठी एक महत्त्वाचे केंद्र आहे, जिथे इंडियन मिलिटरी अकादमी *(IMA)* सारख्या प्रतिष्ठित संस्था आहेत, ज्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देतात. भारतीय सैन्यातील अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण देणारी प्रमुख संस्था, जी तिच्या भव्य कॅम्पस आणि प्रशिक्षण सुविधांसाठी ओळखली जाते.

स्थापनेपासून आजवर ६७ हजारांहून अधिक लष्करी अधिकारी करण्याचा मान या ॲकॅडमीला आहे. आज अनेक क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. त्यामुळेच इंडियन मिलिटरी ॲकॅडमीने यंदा महिलांना प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला आणि पहिल्या तुकडीत निवड चाचणी साठी सईने प्रवेश घेतला. या परीक्षा सर्विस सिलेक्शन बोर्ड या मार्फत होतात त्यासाठी देशभरातून हजारो मुली आल्या होत्या. लेखी आणि मुलाखतीतून ३० मुलींची निवड झाली. त्यातून भोपाळ येथे 'सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड'च्या मुलाखतीतून तीन मुलींची निवड झाली. वैद्यकीय चाचणी आणि लेखी परीक्षेतून तिघींतून सईची निवड करण्यात आली. मुलींच्या जागेसाठी केवळ एक रिक्त जागा होती. त्यातही तिची निवड झाल्यानंतर सोळा मुलांसमवेत तिने सहा महिन्यांच्या खडतर प्रशिक्षणसाठी ती तयार झाली. सहा महिन्यांचे प्रशिक्षण घेणारी ती ॲकॅडमीतील पहिली महिला होती.

प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी प्रचंड कष्ट करावे लागणार होते आणि त्यासाठी साहस ही खूप महत्त्वाचे होते याची जाणीव तिला होती. कारण हे प्रशिक्षण घेताना अनेक कठोर चाचण्यांना सामोरे जावे लागणार होते. प्रशिक्षण घेताना पाठीवर वीस किलोची बॅग हातामध्ये सुमारे चार किलो वजनाची रायफल घेऊन ३० किलोमीटर अंतर धावत पूर्ण करावे लागत होते. हे सर्व तिला निर्धारित वेळेत पूर्ण करावे लागणार होते. यासह अन्य खडतर परिश्रमानंतरच तिचे लेफ्टनंट पदाचे स्वप्न पूर्ण होणार होते. आणि हे सर्व तिने जिद्दीने पूर्ण केले आणि इंडियन मिलिटरी अकॅडमी आयएमए मधून पहिली महिला लेफ्टनंट पदी रुजू होण्याचा मान तिने मिळवला आहे.

१३ डिसेंबर २०२५ रोजी टेरिटोरियल आर्मीमध्ये लेफ्टनंट पदावर तिची नियुक्ती झाली आहे. इंडियन मिलिटरी ॲकॅडमीच्या इतिहासात पहिली महिला लेफ्टनंट होण्याचा मान मिळवीत तिने कोल्हापूरचे नाव उंचावले आहे.

B. Voc. (Animation & film making) - I (Sem - II) - NEP-1.0

| Sr. No. | Day & Date | Time | Course Code | Course Name |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | | | |